# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विविध शिष्यवृत्ती योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाच्या मुदतवाढीसंदर्भात
### शैक्षणिक वर्ष २०१९–२०

**"क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना"**
**"आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"**
**"राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"**
**" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना"**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९–२० या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत परिपत्रक क्र. ०३/२०२० अन्वये दि. २५/०१/२०२० पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन (Online) अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात येत असून पात्र विद्यार्थ्यांनी परिपत्रकातील विहित नियम व अटीनुसार **दि. ३१/०१/२०२०** पर्यंत ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज करावेत. तसेच महाविद्यालय/ विद्यापीठ विभागाने विद्यार्थींनी ऑनलाईन (Online) पध्दतीने भरलेल्या अर्जाची छाननी करून आपल्या महाविद्यालय/ विद्यापीठ विभागाच्या PUNCODE वरून **दि. ०५/०२/२०२०** पर्यंत (Online) पध्दतीने विद्यापीठास सादर करावे.

त्याचप्रमाणे, खालील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वरील शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज करता येतील.

| Name of the Courses | |
|---|---|
| B. A. Liberal Arts | B. Sc. / M. Sc. Scientific Computing |
| B. Sc. Blended (Env. Science) | B. Sc. / M. Sc. Bioinformatics |
| B. Voc. Automotive Automation, IT & ITeS, Renewable Energy, Jewellery design and Gemology, Retail Management | B. Sc. / M. Sc. Biotechnology |
| B.A / M. A. Natural Resource Management and Sustainable Development | B. Sc. / M. Sc. Computer Science |
| Master of Library & Information Science | B. Sc. / M. Sc. Electronic Science |
| B. B. A. | B. Sc. / M. Sc. Environmental Sciences |
| Master of Public Health | B. Sc. / M. Sc. Instrumentation Sciences |
| B. Sc. / M. Sc. Geoinformatics | B. Sc. / M. Sc. Atmospheric Sciences |
| B. Sc. / M. Sc. Tech. Industrial Mathematics with computer Ap. | B. Sc. / M. Sc. Biotechnology Five Years |
| B.A. / M.A. (Yoga) | B. Sc. / M. Sc. Health Sciences |

वरील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यासाठी यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ }
संदर्भ : शै.प्रवेश/३३५ }
दिनांक : २४/०१/२०२० }

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता

मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी सलंग्नित सर्व महाविद्यालय (अव्यवसायिक अभ्यासक्रम)

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.